# राजपुत्र अंभीचे योगदान !

अलेक्झांडर हिंदुस्थानात आला होता सिंध व पंजाब हे दोन प्रांत मॅसिडोनियन साम्राज्यात समाविष्ट करण्यासाठी. त्यामुळे आपण जगज्जेता होऊ अशी त्याची कल्पना होती. हे दोन्ही प्रांत पर्शियन साम्राज्यात एकेकाळी मोडत. दारिवस तिसराचा पराभव केल्यानंतर तो हिंदुस्थानकडे वळाला. कुठल्याही परिस्थतीत त्याला हे साध्य करणे त्याच्या सम्राटपदाच्या मुकुटाशी जोडले गेल्याने आवश्यक होते. ती त्याची प्रायोरिटी (330 इसवी सनपूर्व) होती. पुरूचा पराभव अंभीचे आमंत्रण महत्वाचे नव्हते.

ग्रीक इतिहासकारांनी त्याचा बादरायण संबंध सम्राट अंभीशी जोडून राजपुत्र अंभीला उगीचच बदनाम केले. ग्रीक इतिहासकारांना हवा तसा अंभी वागला नाही. अलेक्झांडरनेही त्या इतिहासकारांनी अपेक्षा केल्याप्रमाणे वर्तणूक केली नाही ही एक फार मजेशीर गोष्ट आहे.

त्या ठळक बाबींवर नव्याने संशोधन होणे गरजेचे आहे.

ग्रीक नोंदीप्रमाणे अलेक्झांडरचा मुक्काम इसवी सनपूर्व फेब्रुवारी 326 ते मार्च एवढा फक्त एकच महिना तक्षशिलेत गेला. तेव्हा त्याच्या बरोबर एक लाख वीस हजार सैन्य होते. (प्लुटार्क) तो जुलैच्या पहिल्या आठवडयात पुरूशी युध्द खेळला. त्यावेळी त्याच्याजवळ फक्त अकरा हजार ते सतरा हजार एवढीच सेना होती. त्याला चंद्रगुप्त मौर्य तक्षशीलेच्या त्याच्या छावणीत येऊन भेटला तो एप्रिल वा मे इसवी सनपूर्व 326 मध्ये. त्यावेळी अलेक्झांडरने त्याला ठार मारण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. (प्लूटार्क कर्टीस एरियन)


या दोन्ही नोंद अलेक्झांडरच्या युध्दकौशल्य व मुत्सद्दीपणाला काळे फासणाÚया आहेत व राजपुत्र अंभीला पूरक आहे. तक्षशिलेत अलेक्झांडर जूनपर्यंत राहिला. ग्रीक नोंद म्हणते– अंभीने अलेक्झांडरचा सत्कार केला. त्याला मेजवान्या दिल्या. त्याच्या सैन्याला विश्रांती व औषधोपचार यासाठी पूर्ण एक महिना दिला. स्वतःचे राज्य त्याच्या हवाली केले. इतकेच नव्हे तर पाच हजार सैनिकही अलेक्झांडरला दिले, असे सांगणारे ग्रीक युध्द जुलैपर्यंत का लांबले हे सांगत नाहीत.

यात तीन गोष्टी स्पष्ट होतात. पुरूचा पराभव व्हावा अशी कुठल्याही हिंदुस्थानी व्यक्तिमत्वाची कृती झालेली दिसत नाही. अंभीने युध्द जुलैमध्ये घडवून आणण्यासाठी अलेक्झांडरला ससैन्य सत्कार, मेजवान्या व सुखोपभोगात युध्दभूमीपासून शंभर मैल दूर

अडकवून ठेवले. चंद्रगुप्त व आर्य चाणक्यंना त्याने गुप्त व सुरक्षित ठिकाणी लपवून ठवले. चंद्रगुप्तला स्वतःच्या हेरांकरवी अलेक्झांडरच्या छावणीतून निसटून जाण्यास मदत केली. त्याची रसद तोडली. त्याच्या एक लाख सैन्याला पळून जाण्यासाठी मदत केली किंवा त्यांना पळवून लावले किंवा अज्ञात मार्गाने पुरूकडे पोचण्यासाठी मदत केली. अंभीने हिंदुकुशमार्गे जाणारा परिचित मार्ग बंद करून अलेक्झांडरला पळून जाण्यासाठी साधनसंपत्ती, माणसे मिळणार नाहीत याची पूर्ण काळजी घेतली असे घटनाक्रम सांगतात.

ग्रीकांना हे कसे समजले नाही ? एखादी कृती जर एखाद्या योजनेनुसार होत असेल तर शत्रूला ती कळण्यास उशीर होत नाही. अलेक्झांडर हिंदुस्थानात अठरा महिने राहिला, त्यापैकी दहा महिने हे त्याचे हिंदुस्थानातून पळण्यामध्ये गेले. राहिलेल्या आठ महिन्यांत पाच ते सहा महिने (नक्की कळत नाही) तक्षशिलेत आरामात गेले. म्हणजे युध्दाची तयारी, वाहतूक जिंकलेल्या प्रदोचे व्यवस्थापन, एक लाख वीस हजार सैन्याचा व जनावरांचा अन्नपुरवठा–कडबा याची व्यवस्था यात त्याचा बराच काळ गेला. पुरूशी पंगा घेतल्याने त्याने अकारण स्वतःचा मुखभंग केला व स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेतला. तो एखाद्या रणधुरंधर सम्राटासारखा वागला नाही. पुरू ऐन पावसात कुठेही न जाता युध्दभूमीवर आपली मार्चेबंदी करत होता. वीस हजार हिंदुस्थानवासियांना मारणारे ग्रीक स्वतःची हानी फक्त दानशे ऐंशी सांगतात (एरियन) यावरूनच त्यांचा इतिहास, नोंदी इतिहासकार काय दर्जाचे लोक आहेत हे कळते.

अलेक्झांडरला जिंकायला हिंदुस्थान्यांनी कुठे वावच ठेवला नाही. आर्य चाणक्य अलेक्झांडरच्या वास्तव्य काळात पंजाबात सर्वत्र भटकत होता ते अलेक्झांडरला कळले नाही. चंद्रगुप्तचा ठिकाणा कळला नाही, स्वतःचे सैन्य पळाले हे कळले नाही हिंदुस्थान्यांचे राजकारण, प्रदेश, भूगोल व स्वत्वाची जाणीव त्याला झाली नाही. तो बियास म्हणजे झेलमपुढे आणखी अडीचशे मैल गेला नाही. मग तो हिंदुस्थानात आला कशासाठी ?




ग्रीक नोंदीत बराच गोलमाल आहे. कारी ही युध्दभूमी (पाच मैल x पाच किंवा एक मैल ) झेलम नदीच्या दक्षिणेला तक्षशिलेपासून फक्त शंभर मैल दूर असलेल्या बझाल्ट रॉकच्या टेकडीखालील मैदानात झाली. हा पुरूचा प्रदेश असल्याने त्याने हे मैदान युध्दासाठी निवडले व त्यानुसार त्याने मोर्चेबंदी केली. युध्द कुठे खेळावे याचे स्वातंत्र्य त्याला होते, अलेक्झांडरला नव्हते ज्या प्रदेशात जी माणसे राहतात त्यांनाच त्या प्रदेशातील बदलते हवामान कसे असेल याची कल्पना असणार. प्रदेशही न पाहिलेल्या परकीयाला ती कशी समजणार ?

अलेक्झांडरचेही तेच झाले. ग्रीकांनी ही गोष्ट मान्य केली आहे. अलेक्झांडर व त्याचे जास्तीत जास्त सतरा हजार सैनिक युध्दभूमीवर जूनच्या कुठल्यातरी आठवडयात आले याचा अर्थ अलेक्झांडर एक परकी शहरात स्वतःच्या सैनिकांच्या गराडयात स्वतःच्या अधिकाÚयांसमवेत मदिरा–मदिराक्षींच्या सहवासात काळ कंठीत होता. त्याचे अधिकारी व सैनिकही त्याचेच अनुकरण करत पाच महिने मजेचे जीवन घालवत होते. सहा वर्षे आधी कलेली पायपीट, त्रास यांना एकदम आराम मिळाला. माणसाची ही सहज प्रवृत्ती आहे. याकाळात अलेक्झांडरने आराम व मौजमजा याव्यतिरिक्त काही केले नाही. त्याला चंद्रगुप्त मौर्य वा आर्य चाणक्य जे त्याच्या मुळावर आले त्यांना शोधयची गरज भासली नाही. राजपुत्र अंभीने त्याला मिठ्ठीस बोलून गाफील ठेवण्याचा यशस्वी उद्योग केला. हिंदुस्थानीयांच्या एकूण वागण्यात एक निश्चित तर्कसंगती आहे. अंभी, आर्य चाणक्य, चंद्रगुप्त मौर्य व पुरू ही चारही व्यक्तिमत्वे एखाद्या योजनेनुसार वागली असे स्पष्टपणे जाणवते. अलेक्झांडरच्या वागण्यात अशी तर्कसंगती शोधूनही सापडत नाही.

चारही हिंदुस्थानी व्यक्तिमत्वे युध्द फेब्रुवारीत न होता पावसाच्या ऐन गैरसोयीच्या काळात कसे होईल याचा विचार करत होती. त्याच योजनेनुसार ती वागली. पुरूजवळ स्वतःचे सैन्य पाच ते सात हजार असताना युध्दाच्या वेळी जुलै महिन्यांत ही संख्या पन्नास हजार झाली. याचे कारण आर्य चाणक्य व चंद्रगुप्त मौर्य यांच्या मधल्या काळातील प्रयत्नाला आहे. (महावंश टिका) या काळात अंभीने दोघांनाही गुप्तपणे लपवून ठेवले. त्यांच्या वाहतुकीची चोख व्यवस्था केली व बहुधा ग्रीक सैन्यातील एक लाख हिंदुस्थानीयांना पळवून लावले किंवा पुरूच्या सैन्यात दाखल केले. झेलम नदीतील बेटांची माहिती ग्रीकांना नव्हती. पावसाचे, पुराचे, धनधान्य पुरवठयाचे व वाहतुकीचे कसले ही नियंत्रण अलेक्झांडरच्या हाती नव्हते. म्हणून त्याची कोंडी झाली व त्याचे रसदमार्ग अंभी व निसर्गाने तोडल्यामुळे त्याला पुरूवर युध्द लावण्याची पाळी आली.

गमतीदार गोष्ट ती हीच. कुठल्याही तÚहेचे नियोजन नाही. विचारांची संगती नाही, मानव मूल्यांची कदर नाही. विरोधी करील त्याचे मुंडके उडवायचे, कपट–कारस्थाने व सर्वतÚहेची व्यसने–अनाचार यांचे केवळ एक मानवी अस्तित्व असलेला अलेक्झांडर केवळ अपघाताने वा नशिबाने ग्रीक सम्राट झाला. केवळ वीस वर्षाचा असताना तर तेहत्तीसाव्या वर्षी या सर्व दुर्गणांचा परिपाक झाल्यावर मरण पावला. एखाद्या हिंदी सिनेमातल्या नाव कमावलेल्या व डोक्यात वारे शिरलेल्या, जनावरे–माणसे मुंगीसारखी चिरडणाÚया हीरोसारखा. तो पळाला अत्यंत अपमानास्पदपणे फक्त जगल्या–वाचलेल्या दोन ते तीन हजार सैन्यासह त्यांचीही वाताहत दहा महिन्यांत इतकी झाली की अलेक्झांडर बॅबिलोन या गावी जेमतेच पोचला. तेव्हा फारच थोडे सैनिक त्याच्याबरोबर होते. त्याचा मृत्यू ॲरिस्टॉटलने दारूतून विष देऊन केला.

या सर्व घटनाक्रमाला त्याच्या कबरीचे छायाचित्रण वैज्ञानिक विश्लेषण पुष्टी देणारे आहे. (डिस्कव्हरी–एपिसोड ऑन अलेक्झांडर– मेजर ग्रीव्ह). एक अत्यंत असंस्कृत व्यक्तिमत्व लाखो लोकांना ठार मारून, जायबंदी करून, लाखो स्त्रियांची अब्रु लुटून, शहरे जाळून काळाआड गेले. त्याचे शाळा–कॉलेजमध्ये जगज्जेता म्हणून एखाद्या शिक्षकाने वा प्राध्यापकाने कौतुक करावे असे त्याने काही केले नाही मिळवले नाही, दुसÚयाला मिळवून दिले नाही, मिळू दिले नाही. हिंदुस्थानी संस्कृतीला त्याचे कसले योगदान नाही. त्याच्यामुळे ग्रीक संस्कृती, कला, विज्ञानाचा परिचय हिंदुस्थानींना झालेला नाही. उलट हिंदुस्थानी कलाविज्ञाने व संस्कृतीचा परिचय नोकायन व खुश्की (ट्रेड रूट व पहिल्या शतकातला सिल्करूट) या मार्गाने ग्रीकांनाच पाच हजार वर्षापूर्वी झाला होता. ज्या तक्षशिलेत तो सहा महिने वावरला. त्या विश्वविद्यालयाचे अस्तित्व त्याच्याही अगोदर पाचशे वर्षे तरी होते. तो सताधीश, रणधुरंदर, विज्ञानी, कलासक्त यापैकी काही असता तर या काळात त्याने विद्यापीठाला एकदा तरी भेट दिली अशी ग्रीकांनी कुठेतरी नोंद करायला हवी होती. हातच्या कंकणाला आरसा कशाला ? राजपुत्र अंभीने त्याला बोलावले नसते तरीही तो आलाच असता. ज्या पर्शियनांनी इथे राज्य केले ते सिंधमार्गे हिंदुस्थानात आले. सिंधच्या वाळवंटाकडून पंजाबकडे येणे कष्टाचे आणि त्रासदायक आहे. खेडी, वसाहती जवळ नसल्याने मोठया सैन्याची वाहतूक पुरवठा होऊ शकत नाही. अलेक्झांडरने सिंधमार्गे येण्याचा प्रयत्न केला नाही याचे कारण हेच आहे. त्याच्या सैन्यांची प्रचंड हानी झाली असती. त्याचा परतीचा प्रवास त्याच्यावर अपेक्षा नसलेल्या प्रदेशातून करावा लागला व त्याची प्रचंड मनुष्यहानी झाली. तोही जर कुणा हिंदुस्थानी सम्राट, टोळीप्रमुखाच्या हाती लागला असता तर त्यांनी त्याला ठारच मारले असते.

– – –